जाक्र/जिपऔ/शिक्षण/प्रावि-३/२०१०-२०११/ १८३०।
कार्यालय,जिल्हा परिषद औरंगाबाद.
दिनांक. ०१.०६.२०१०

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
**श्री स्वामी सत्यानंद सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ**,सिडको,एन-२,औरंगाबाद संचलित
**भगवती विद्यामंदीर**,
एन-२,सिडको,औरंगाबाद.

**विषय : नैसर्गिक वाढीनुसार इयत्ता २ री,३ री व ४थी च्या वर्गास कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबत.**

संदर्भ : शासन निर्णय क्र.व्ही.एल.एस.-१००२/१०००/२/प्राशि-३,दिनांक.२३.०९.२००३

उपरोक्त विषयी व संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने **श्री स्वामी सत्यानंद सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ**,सिडको,एन-२,औरंगाबाद संचलीत **भगवती विद्यामंदीर**,एन-२,सिडको,औरंगाबाद या शाळेस इयत्ता **२ री,३ री व ४थी** च्या नैसर्गिक वाढ च्या प्रस्तावावर गट शिक्षणाधिकारी / शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या तपासणी अहवाल व शिफारसीनुसार वरिल शाळेस इयत्ता **२ री,३ री व ४थी** च्या वर्गास कायमविना अनुदान तत्वावर खालिल अटीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येते.

## -: कायम विना अनुदान तत्वावरील नैसर्गिक वाढीचे/अतिरिक्त तुकडयाचे आदेश :-

| अ क्र | शाळेचे नांव | माध्यम | वर्गाचे वर्ष | इयत्ता | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री स्वामी सत्यानंद सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ**,सिडको, एन-२,औरंगाबाद संचलित **भगवती विद्यामंदीर**, एन-२,सिडको,औरंगाबाद. | **मराठी** | **२००६-२००७<br>२००७-२००८<br>२००८-२००९** | **२री<br>३री<br>४थी** | **कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात येते.** |

उपरोक्त वर्गास नियमानुसार पुरेशी जागा,इमारत,फर्निचर,शालेयसाहित्य,व प्रशिक्षीत शिक्षकांची नेमणूक त्याच प्रमाणात विद्यार्थी संख्या असणे हे संस्थेवर बंधनकारक राहील.सदर शासन मान्यता मुबंई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४९ चे नियम (१०७) मधील अटिच्या अधिन राहून देण्यात येत आहे.सदर अटिंची पूर्तता शाळा करित नसल्यास व तसे तपासणी अंती निदर्शनास आल्यास सदर शाळेची उक्त अधिनियमातील नियम (१०९) अन्वये शाळेची शासन मान्यता रद्य करण्यात येईल.याची संस्थेने नोंद घ्यावी. दिलेल्या आदेशाचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील. सदर वर्गाच्या विद्यार्थी संख्या उलट तपासणीच्या वेळेस कमी आढळून आल्यास सदर वर्गाची मान्यता काढून घेण्यात येईल याची ही संस्थेने नोंद घ्यावी.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद,औरंगाबाद.**

P-3 (Kakade)